# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 171/2023 दिनांक : 29.04.2023

## 1)घरफोडी :–

**भाग्यनगर :–** दिनांक 26.04.2023 रोजी 18.30 वाजता ते दिनांक 27.04.2023 रोजी 19.30 वा. चे दरम्यान, **भंडारी नगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांचे कुटूंब घराला कुलूप लावून मुळगावी तळेगाव येथे गेले असता फिर्यादीचे घराचे दाराला लावलेले कुलूप तोडुन घरामध्ये आत प्रवेश करून घरातील सामान अस्ताव्यस्त करून घरातील लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्या चांदीचे दागीने व नगदी असा एकुण 7,05,050/–रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी माधव रामचंद्र जाधव, वय 61 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त रा. तळेगाव ता. उमरी जि. नांदेड ह.मु. रूख्मीनी निवास, भंडारी नगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 170/2023 कलम 454,457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री परगेवार, मो.क्रं. 9028846691** हे करीत आहेत.

## 2)मो.सा. चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 27.04.2023 रोजी 19.00 वा. ते 19.30 वा. चे दरम्यान, **दुध डेअरी चौरस्ता जवळ तुळजाई बाळुमामा हॉटेल समोर, नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांची स्पेलंडर प्लस काळया रंगाची मो.सा. क्रं. एम.एच.26/बी.एच.–7629 किंमती 25,000/– रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी सत्यनारायण हिरालाल भातावाले, वय 43 वर्षे, व्यवसाय शेती रा. वाल्मीकी चौक जुना मुजामपेठ, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 307/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कदम, मो.क्रं. 9881475004** हे करीत आहेत.

## 3)शासकीय कामात अडथळा :–

**1)लोहा :–** दिनांक 27.04.2023 रोजी 19.30 वा. सुमारास, **तलावाजवळ, लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा पांगरा तलावा जवळ महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये कार्यवाहीचे शासकीय कामकाज करीत असताना फिर्यादी व त्यांच्या सोबत असलेल्या कर्मचारी यांचेवर यातील नमुद आरोपीने दगडाने हल्ला करून शिवीगाळ करून लाथा बुक्याने मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी देवून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी राजकिरण दिपक सोनवणे, वय 32 वर्षे व्यवसाय नौकरी, दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क देगलूर अ विभाग रा. बापूनगर, देगलूर ता. देगलूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 104/2023 कलम 353,332,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री महाजन, मो.क्रं. 9689707038** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 28.04.2023 रोजी 10.00 वा. सुमारास, **दुध डेअरी चौकाचे पुढे वसंतराव नाईक कॉलेज कमानीचे समोर कच्चा रोडवर वसरणी नांदेड ता. नांदेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्यांची एस.टी. बस क्रंमाक एम.एच.20/बी.एल.–2864 मध्ये प्रवासी घेवून नांदेड येथुन लातुरकडे जात असतांना दुध डेअरी चौकाचे पुढे वसंतराव नाईक कॉलेज कमानीचे समोर कच्चा रोडवर आला असता त्यांचे बस समोर ॲटो क्रमांक एम.एच.26/जी–4599 च्या आरोपी चालकाने आपला ॲटो रॉग साईडने येवून आडवा लावला व फिर्यादीस एस.टी. का चालवतोस म्हणुन शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली व शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी शिवलींग शेषेराव नुच्चे, वय 43 वर्षे व्यवसाय चालक रा. डोनगाव ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 306/2023 कलम 353,332,504,506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री विजय पाटील, मो.क्रं. 9823155291** हे करीत आहेत.

## 4)प्रोव्हिबीशन :–

**1)देगलूर :–** दिनांक 27.04.2023 रोजी 11.30 वा चे सुमारास, **आरोपीचे राहते घरी कुशावाडी तांडा ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या गावठी हातभट्टी दारू किंमती 2900/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आली. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री सचिन आनंदराव रेडेकर,. ने. पोस्टे देगलूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलूर** गुरनं 217/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्रीमती पोवार, मो.नं. 9821159844** हे करीत आहेत.

**2)मरखेल :–** दिनांक 28.04.2023 रोजी 23.20 वा चे सुमारास, **मरखेल ते हाणेगाव जाणारे रोडचे बाजुस पाण्याच्या टाकीजवळ मौजे मरखेल ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1750/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री विष्णुकांत तुकाराम गुट्टे,. ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 94/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/526 पुरी, मो.नं. 9823144893** हे करीत आहेत.

**3)मरखेल :–** दिनांक 28.04.2023 रोजी 19.00 वा चे सुमारास, **मौजे बिजलवाडी मारूती मंदीराजवळ ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या गावठी हातभट्टी दारू किंमती 1500/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3206 चंद्रकांत बाबुराव पांढरे, ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 93/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/64 बारी, मो.नं. 9797530437** हे करीत आहेत.

**4)मरखेल :–** दिनांक 28.04.2023 रोजी 20.50 वा चे सुमारास, **मौजे लोणी ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3360/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री विष्णुकांत तुकाराम गुट्टे,. ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 92/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/526 पुरी, मो.नं. 9823144893** हे करीत आहेत.

**5)मुक्रमाबाद :–** दिनांक 28.04.2023 रोजी 20.00 वा चे सुमारास, **लिंबाचे झाडाखाली मौजे हाळणीतांडा मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या गावठी हातभट्टी दारू किंमती 2000/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/468 माधव रमेश मलगिलवार, ने. पोस्टे मुक्रमाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रमाबाद** गुरनं 118/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2068 कांगणे, मो.नं. 8459537419** हे करीत आहेत.

**6)देगलूर :–** दिनांक 27.04.2023 रोजी 13.30 वा चे सुमारास, **आरोपीचे राहते घरी बळेगाव ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1750/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपानि/श्रीमती आरती शिरीष पोवार, ने. पोस्टे देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 218/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री रेडेकर, मो.नं. 9821159844** हे करीत आहेत.

## 5)गळफास घेवुन शेतकरी आत्महत्या :–

**कंधार :–**दिनांक 28.04.2023 रोजी 09.00 वा. चे सुमारास, **कंधारेवाडी ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे शिवाजी रामराव मंगनाळे वय 35 वर्षे, व्यवसाय शेती रा. कंधारेवाडी ता. कंधार जि. नांदेड** यांनी त्यांचे वडीलांचे नावे असलेले बॅकेचे कर्ज व गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टी ने शेतीचे नापीकीस कंटाळुन स्वतःचे शेतातील झाडास गळफास घेवून आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार बाबू मानिका मंगनाळे, वय 74 वर्षे, व्यवसाय शेती रा. कंधारेवाडी ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे कंधार** आ. मृ. **13**/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मुखेडकर, मो.नं. 8308840863** हे करीत आहेत.

## 6)विषारी औषध पिवून शेतकरी आत्महत्या :–

**अर्धापूर :–**दिनांक 22.04.2023 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **सरकारी दवाखाना, नांदेड येथे,** यातील **मयत नामे जेठन दिनाजी कदम वय 49 वर्षे, व्यवसाय शेती रा. कोंडा ता. अर्धापूर जि. नांदेड** यांनी बॅकेचे कर्ज घेतलेले हप्ते भरले नाही त्यामुळे व शेतीत सतत नापीकी होत असल्याने तणावाखाली वव चिंतेत स्वतःचे शेतात कोणतेतरी विषारी औषध पिल्याने स. द. नांदेड येथे उपचारासाठी दाखल केले असता मरण पावले. वगैरे **खबर देणार मारूती जेठन कदम, वय 28 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. कोंडा ता. अर्धापूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे अर्धापूर** आ. मृ. **12**/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री राठोड, मो.नं. 9823143245** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र. 172/2023  दिनांक : 29.04 .2023

## नांदेड पोलीस दलातील सहा पोलीस अधिकारी, तीन पोलीस अंमलदार सेवानिवृत्त...

नांदेड पोलीस दलातील दोन पोलीस निरीक्षक, चार पोलीस उपनिरीक्षक तीन पोलीस अंमलदार यांची नियत वयोमानानुसार दिनांक 30.04.2023 रोजी सेवानिवृत्ती होणार आहे. **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली, **मा. श्री अबिनाश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **डॉ अश्विनी जगताप**, पोलीस उप अधिक्षक (मु) नांदेड, **मा. श्री कसेकर, मा. श्री. जगताप**, प्रो. उप अक्षीक्षक, **श्री व्दारकादास चिखलीकर**, पोनि स्थागुशा, **श्री शिवाजी लष्करे,** सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी नांदेड, यांचे हस्ते आज दिनांक 29.04.2023 रोजी सर्व सेवानिवृत्तांचा पुष्पगुच्छ, शाल श्रीफळ व भेट वस्तु देवुन सत्कार करण्यात आला. सदर सेवानिवृत्त समारंभ मंथन हॉल पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड येथे पार पडला. सर्व सेवानिवृतांनी आता आपल्या कुटूंबाकडे लक्ष द्यावे व सुखी समाधानाने आनंदी जिवन जगन्याचा सल्ला दिला. सदर सेवानिवृत्त समारंभास. **पोउपनि श्रीमती माया भोसले,** पोलीस कल्याण विभाग नांदेड, ईतर शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार कर्मचारी मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन **रूपा कानगुले**, यांनी केले असुन, **मपोकॉ राखी कसबे**, पोलीस कल्याण, **विनोद भंडारे** यांनी कार्यक्रमाचे नियोजन चांगल्या प्रकारे केले.

| अ.क्र. | हुद्दा | सेविनिवृत्त अंमलदाराचे नाव | नेमणुक |
|---|---|---|---|
| 01 | पोलीस निरीक्षक | भगवान मरीबा धबडगे | पोलीस स्टेशन, इतवारा |
| 02 | पोलीस निरीक्षक | अभीमन्यु बळीराम साळुंके | पोलीस नियंत्रण कक्ष, नांदेड |
| 03 | पोउपनि | भाऊराव पांडुरंग आडे | वि.सु.प. नांदेड |
| 04 | ग्रपोउपनि | अशोक माधव अत्राम | पोस्टे माहुर |
| 05 | ग्रपोउपनि | अब्दुल रियोज अब्दुल रज्जाक | पोस्टे बारड |
| 06 | ग्रपोउपनि | शेषेराव तुकाराम राठोड | पोलीस मुख्यालय, नांदेड |
| 07 | पोहेकॉ/2330 | राम मारूती कानगुले | पोस्टे उस्माननगर |
| 08 | पोहेकॉ/1754 | केशव केरबा हाके | पोलीस मुख्यालय, नांदेड |
| 09 | पोहेकॉ/632 | उदधव गोविंदराव घुले | पोलीस मुख्यालय, नांदेड |

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड



# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 173 / 2023 दिनांक : 29.04 .2023

**अट्टल गुन्हेगार चांदू कदम** यास सहा **महिन्यासाठी नांदेड जिल्ह्यातून हद्दपार** केले.

नांदेड. सन 2016 पासून सतत वेगवेगळ्या गंभीर गुन्ह्यात पोलिसांच्या दप्तरी नोंद असलेला अट्टल गुन्हेगार चांदू दिगंबर कदम ;वय 35 वर्षे याला परभणी, नांदेड, लातूर आणि हिंगोली जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपारीचा प्रस्ताव लिंबगाव ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार यांनी पाठविला होता. उपविभागीय अधिकारी विकास माने यांनी चांदु कदम याला सहा महिन्यासाठी नांदेड जिल्ह्यातून हद्दपार केले आहे.

नांदेड तालुक्यातील निळा येथे राहणारा चांदू दिगंबर कदम हा 2016 पासून हातात घातक शस्त्र सतत वापरत असे, वेळप्रसंगी तो दहशत पसरवत अनेकांना जखमी करत असे, त्यातून अनेक गुन्हे त्याच्या नावावर लिंबगाव पोलीस ठाण्यात दाखल आहेत. एवढेच नाही तर शासकीय मालमत्तेचे नुकसान, शासकीय कर्मचाऱ्यांना मारहाण यासह आदी गंभीर गुन्हे त्याच्याविरुद्ध दाखल होते. निळा या गावात व परिसरात त्याची दहशत होती. त्या दहशतीचा बिमोड करण्यासाठी उपविभाग नांदेड ग्रामीणचे सहाय्यक पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्याकडे प्रस्ताव पाठवण्यात आला होता. मा. गौहर हसन यांनी सखोल तपास करून प्रस्ताव मंजूर करून तो उपविभागीय अधिकारी नांदेड विकास माने यांच्याकडे पाठविला. आरोपी चांदु कदम हा सराईत व सवयीचा गुन्हेगार असल्याने उप विभागीय अधिकारी, विकास माने यांनी चांदु कदम याला नांदेड जिल्ह्यातून सहा महिन्यासाठी हद्दपार केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड